मा० न्यायालयाकरिता

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** जिल्हापेठ **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0267 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/04/2022 18:18 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 11/04/2022
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/04/2022
**Time From (वेळेपासून):** 14:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:00 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 11/04/2022 **Time (वेळ):** 18:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 021 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/04/2022 18:08 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 2 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** आंबेडकर मार्केट मधे,जळगाव

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** पंकज वासुदेव पाटील

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गट नं 20 प्लट नं 45 ,निमखेडी शिवार जळगाव,जळगाव,जिल्हापेठ ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गट नं 20 प्लट नं 45 ,निमखेडी शिवार जळगाव,जळगाव,जिल्हापेठ ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गोपाळ कडु चौधरी | | | 1. पाडळसा ता यावल जिजळगाव,यावल, जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

लागलीच

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

1) पोलीस स्टेशन ,गुरनं व कलम भाग 6 गुरन 0267/2022 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम सन 1988 कलम 7 प्रमाणे जिल्हापेठ पोस्टे जळगाव गुरन 0267 /2022 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम सन 1988 कलम7प्रमाणे 2)मुळ तक्रारदार व फियादीचे नांव:- पंकज वासुदेव पाटील वय- 35 धंदा -हातमजुरी रा. गट नं. 20 प्लट नं. 45 निमखेडी शिवार जळगाव ता.जि जळगाव3) आरोपीचे नांव पत्ता -गोपाळ कडु चौधरी .वय -55 व्यवसाय नोकरी शिपाई सहाय्यक कामगार आयुक्त कार्यलय जळगाव रा. जुनाखेडी रोड DNCकॉलेज जळगाव मुळ रा. पाडळसा ता. यावल जि.जळगाव (खाते उर्जा व कामगार विभाग - वर्ग 4 )4) गुन्हा घडला ता. वेळ.व ठिकाण-- दि. 11/04/2022 रोजी 14.00 वा. जळगाव शहरातील डाँ. बाबसाहेब अंबेडकर मार्केट मध्ये अनिल एजेन्सी दुकानात . 5) गुन्हा दाखल ता.व.वेळ दि 11/04/2022 रोजी वा6) आरोपी अटक ता. व. वेळ 11/04/2022 रोजी वा. 7) लाचेची मागणी रक्कम 2,25,000/- रु तडजोडीअंती 2,10,00/-रूपये8)हस्तगत लाचेची रक्कम 30,000/- रु त्यात 500 रू दराच्या 60 चलनी नोटा9) सापळा व तपास अधिकारी - श्री एस.एस. पाटील. पोलीस उपअधिक्षक , अँन्टी करप्शन ब्युरो. जळगाव10) गुन्हयाची थोडक्यात हकीकत यातील फिर्यादी यांनी दिनांक 30/03/2022 रोजी सहाय्यक कामगार कार्यलय जळगाव येथे जळगाव माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ जळगाव यांच्या नावे जिल्हा सुरक्षा मंडळामध्ये सिक्युरीटी गार्ड म्हणुन नोकरी मिळण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रा सह लेखी अर्ज सादर केला होता. दिनांक 30/03/2022 रोजी फिर्यादी यांनी शिपाई गोपाळ चौधरी यांची भेट घेतली तेव्हा त्यांनी माझे वरिष्ठ अधिकारी यांच्यासी चांगळे संबंध आहे मी कोणतेही काम आमचे वरिष्ठ अधिकारी यांचेकडेस घेवुन गेलो तर ते लगेच करुन देतात यापुर्वी मी ब-याच मुलांचे कामकरुन दिले आहे. तुझ्या सारखे अनेक मुलांनी सिक्युरीटी गार्ड म्हणुन नोकरी मिळणेसाठी अर्ज सादर केलाला आहे. जर तुला सुक्युरीटी गार्डची नोकरी हवी असेल तर मी तुला वरीष्टा कडुन सुक्युरीटी गार्डची नोकरी मिळुन देतो त्यासाठी तुला 2,25,000/- रुपये मला द्यावे लागतील असे सांगुन 2,25,000/- रुपये लाच मागणीकेली त्याबाबत फिर्यादी यांनी दिनांक 11/04/2022 रोजी अँकब्यु जळगाव कार्यालयात तक्रार दिली. सदर तक्रारीची अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव पथकाने दि.11/04/2022 रोजी पळताळणी केली असता यातील आरोपी यांनी फिर्यादी यांना जिल्हा सुरक्षा रक्षक मंडाळामध्ये सिक्युरीटी गार्ड म्हणुन नोकरी मिळुन देण्याच्या मोबदल्यात प्रथम 2,25, 000 /-रुपये तडजोडीअंती 2,10,00/-रूपयेलाच मागणी करुन त्या पैकी पहिला हप्ता 30,000/- रुपये आरोपी यांनी वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी स्वता: स्विकारली म्हणुन गुन्हा. सोबत संगणीकृत केलेली फिर्याद या सोबत जोडलेली आहे.

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): RAMDAS BALIRAM WAKODE (I (Inspector)) / RAMWAK196573 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
11/4/22

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमंलदार
जिल्हापेठ पो.स्टे. जळगांव

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): RAMDAS BALIRAM WAKODE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): RAMWAK196573

फिर्याद

जिल्हापेठ पोलीस स्टेशन
दिनांक ११.०४.२०२२

**मी पंकज वासुदेव पाटील, वय ३५ वर्षे, व्यवसाय हातमजुरी रा. गट नं. २०, प्लॉट नं.४५, निमखेडी शिवार जळगांव मो.नं.९१५६३९९९९१,७४९९०२२०३८**

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे आई,वडील,पत्नी व दोन मुलींसह राहतो.मी दि.११.०४.२०२२ रोजी सकाळी अॅन्टी करप्शन ब्युरो,कार्यालयात समक्ष हजर राहून पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांचेकडे सहायक कामगार आयुक्त कार्यालय,जळगांव येथील शिपाई श्री.गोपाळ चौधरी यांचेविरुध्द लाचे संबंधी लेखी तक्रार दिली ती पाहता खालील प्रमाणे

समक्ष हजर राहुन तक्रार लिहून देतो की, मी वरील ठिकाणी माझी आई, पत्नी,भाऊ व दोन मुलींसह राहतो. हातमजुरी करून माझ्या कुंटुंबाचा उदरनिर्वाह करतो.माझे शिक्षण बी.ए.ग्रॅज्युएट झालेले असुन मी सध्या सुशिक्षीत बेरोजगार आहे.मला हातमजुरी करुन माझे कुंटूंबाचा उदनिर्वाह करणे शक्य होत नसल्यामुळे मी छोटया मोठया खाजगी किंवा सरकारी नोकरीच्या शोधात आहे. सहायक कामगार आयुक्त कार्यालय, जळगांव व्दारे मा.जळगांव माथाडी व असरंक्षित कामगार मंडळ येथे सिक्युरिटी गार्डची भरती होणार असल्याबाबत मला दि.२५.०३.२०२२ रोजी माहीती मिळाली होती.

त्या संदर्भात दि.२८.०३.२०२२ रोजी मी सहायक कामगार आयुक्त कार्यालय, जळगांव येथे जावुन चौकशी केली असता मला सदर कार्यालयातील शिपाई श्री.गोपाळ चौधरी हे भेटले व त्यांनी मला सांगितले की, मा.जळगांव माथाडी व असरंक्षित कामगार मंडळ येथे सिक्युरिटी गार्डची ०८ पदे भरली जाणार आहेत. त्यासाठी सहायक कामगार आयुक्त कार्यालय, जळगांव येथे अर्ज करावा लागणार बाबत सांगितले होते.

त्यानंतर मी दि.३०.०३.२०२२ रोजी सहायक कामगार आयुक्त कार्यालय, जळगांव येथे मा.जळगांव माथाडी व असरंक्षित कामगार मंडळ, जळगांव यांचे नावे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामध्ये सिक्युरिटी गार्ड म्हणुन नोकरी मिळणेसाठी लेखी अर्ज सादर केला होता. मी सदरचा अर्ज सादर करीत असतांना सदर कार्यालयातील शिपाई श्री.गोपाळ चौधरी हे मला भेटले.तेव्हा त्यांनी मला माझे वरीष्ठ अधिकारी यांचेशी चांगले संबंध आहेत, मी कोणतेही काम आमचे वरीष्ठ अधिकारी यांचे कडे घेवुन गेलो तर ते लगेच करुन देतात. यापुर्वी मी ब-याच मुलांचे काम करुन दिलेले आहेत, तुझ्या सारखे अनेक मुलांनी सिक्युरिटी गार्ड म्हणुन नोकरी मिळणेसाठी अर्ज सादर केलेले आहेत. जर तुला सिक्युरिटी गार्डची नोकरी हवी असेल तर मी तुला वरीष्ठांकडून सिक्युरिटी गार्डची नोकरी मिळवुन देतो. त्यासाठी तुला २,२५,०००/-रु. मला द्यावे लागतील असे सांगितले. तेव्हा सहायक कामगार आयुक्त कार्यालय, जळगांव या कार्यालयातील शिपाई गोपाल चौधरी हे मला सिक्युरिटी गार्डची नोकरी लावुन देण्याच्या मोबदल्यात माझे कडेस २,२५,०००/-रु. लाचेची मागणी करीत असल्याबाबत माझे लक्षात आले. तेव्हा मी त्यांना पैश्यांची व्यवस्था करुन तुम्हाला नंतर येवुन भेटतो असे सांगुन सदर कार्यालयातुन निघुन आलो आहे.

सहायक कामगार आयुक्त कार्यालय, जळगांव येथील शिपाई श्री. गोपाळ चौधरी यांनी मला जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामध्ये सिक्युरिटी गार्ड म्हणुन नोकरी मिळवुन देण्याच्या मोबदल्यात त्यांनी मागणी केलेली २,२५,०००/-रु.लाच रक्कम देण्याची माझी मनापासुन इच्छा नाही. परंतु मी जर शिपाई गोपाळ चौधरी यांना २,२५,०००/-रु.लाच रक्कम दिली नाही तर ते मला सिक्युरिटी गार्डची नोकरी मिळवुन देणार नाहीत अथवा सदर कामात अडथळा निर्माण करतील म्हणुन मी नाईलाजास्तव सदर लाच रक्कम देण्यास तयार झालो आहे.तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे. मी आज दि.११.०४.२०२२ रोजी जळगांव शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्केट मधील दुस-या मजल्यावर असलेल्या सहायक कामगार आयुक्त कार्यालय, जळगांव येथे शिपाई श्री. गोपाळ चौधरी यांची भेट घेण्यासाठी जाणार आहे.बाबत नमुद आहे.

त्यानंतर पाटील साहेब यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले व पुढील सापळा कारवाई जळगांव शहरातील शामा मुखर्जी उद्यान येथे जावुन करण्याचा निर्णय घेतला.त्याप्रमाणे मी माझे जवळील मोटर सायकलने तसेच पोलीस उपअधिक्षक श्री.एस. एस.पाटील साहेब, दोन शासकीय पंच व सापळा पथक असे स्वतंत्र वेगवेगळया मोटर सायकलीने अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयातुन निघुन जळगांव शहरातील शामा मुखर्जी उद्यानात गेलो.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच क्रं.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पाटील साहेब यांनी त्यांचे कडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच क्रं.१ अशांना पुन्हा सुचना देवुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला पंच क्रं.१ यांचेसह जळगांव शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्केट मधील दुस-या मजल्यावर असलेल्या सहायक कामगार आयुक्त कार्यालय, जळगांव येथे शिपाई श्री.गोपाळ चौधरी यांची भेट घेण्यासाठी माझे मोटार सायकलसह पाठविले होते. तेव्हा मी पंच क्रं १ यांचेसह जळगांव शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्केट जवळ गेलो. तेव्हा मी सदर कार्यालयाच्या बाहेरुन माझे मोबाईल फोनवरुन शिपाई गोपाळ चौधरी यांचे मोबाईल फोनवर फोन लावुन मी कार्यालयाचे जिन्याजवळ आलो असल्याचे सांगितले. तेव्हा शिपाई गोपाळ चौधरी यांनी मला सदर मार्केट मधील दुस-या मजल्यावर असलेल्या सहायक कामगार आयुक्त कार्यालय, जळगांव कार्यालयात येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच क्र.०१ असे सदर कार्यालयात गेलो. तेव्हा मी सदर कार्यालयात उपस्थीत असलेले शिपाई श्री.गोपाळ चौधरी यांची भेट घेतली. तेव्हा शिपाई गोपाळ चौधरी यांचेत व माझेत माझे कामाविषयी चर्चा झाली. तेव्हा शिपाई गोपाळ चौधरी यांनी मला घरुन कागदपत्रे घेवुन ये असे सांगुन त्यांच्या उजव्या हाताच्या अंगठयाने व पहिल्या बोटाने पैश्यांचा ईशारा केला.तेव्हा मी तुम्ही सांगा ना, असे सांगितले. तेव्हा शिपाई गोपाळ चौधरी यांनी मला ते येवुन जावुन यीन सव्वा दोन मध्ये, माझं नही, मी समोरच्याले अंस, असे सांगितले. तेव्हा मी दोन सव्वा दोन, काय पण, दोन सव्वा दोन पेमेंन्ट, कमी जास्त काहीच होणार नाही फिक्स, एखादी फिक्स सांगुन द्या माले. दोन का सव्वा दोन

असे सांगितले असता शिपाई गोपाळ चौधरी यांनी दोन दहा पर्यन्त देवुन दे असे सांगितले. तेव्हा मी दोन दहा, त्याच्यात काही कमी जास्त होणार नाही. असे सांगितले असता शिपाई गोपाल चौधरी यांनी आता पंधरा माहया पासनं कमी करी टाकले या आकडयातुन असे सांगितले. तेव्हा मी तुम्ही दोन दहा म्हणतायं, तेवढं पेमेंन्ट आता घरात पडलेलं नाही हे, असे सांगितले असता शिपाई गोपाळ चौधरी यांनी मला नाही एकदा नाही देणं, काही ते आपल्याले असे सांगितले. तेव्हा मी मंग कसं कसं देणं हे, असे विचारले तेव्हा त्यांनी तीन टप्यात देनं हे ते आपल्याले असे सांगितले.तेव्हा मी चालेलं जेवढे घरात असेल तेवढे तुम्हाला टोकन मध्ये आणुन देतो, तुम्हाला किती वाजता येवु,अर्धा एक तासात असे विचारले असता शिपाई गोपाळ चौधरी यांनी मला दिड वाजे पर्यन्त ये, असे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रं.१असे सापळा पथकाजवळ परत आलो होतो.त्यानंतर माझे व शिपाई गोपाळ चौधरी यांचे मधील संभाषण दोन्ही पंचानी व पाटील साहेब यांनी ऐकले.तेव्हा दोन्ही पंच व पाटील साहेब यांची लाचमागणी बाबत खात्री झाल्याने व वेळ कमी असल्याने पाटील साहेब यांनी पुढील सापळा कार्यवाही सलगपणे करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला शिपाई गोपाळ चौधरी यांना देण्यासाठी किती रक्कम आणलेली आहे. असे विचारले असता मी माझे घर खर्चामधुन ३०,०००/—रू. (त्यात ५००/—रू.दराच्या ६० नोटा) रक्कम आणली असल्याचे सांगुन ३०,०००/—रू. रक्कम (त्यात ५००/—रू.दराच्या ६० नोटा) पाटील साहेब यांचे समक्ष हजर केली. तेव्हा पाटील साहेब यांचे सुचनेनुसार पोकॉ/ईश्वर धनगर यांनी सदर नोटांना अ.पावडर लावुन सदरच्या नोटा माझे पॅन्टच्या पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच क्रं.१ अशांना पुन्हा महत्वाच्या सुचना दिल्या. त्यानंतर पाटील साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पुन्हा नविन मेमरी कार्ड टाकुन सदरचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्रं.१ यांचेसह शिपाई गोपाळ चौधरी यांना त्यांचे मागणी केल्या प्रमाणे २,१०,०००/—रु. लाच रक्कमे पैकी पहिला हप्ता म्हणुन ३०,०००/— रुपये लाच रक्कम देण्यासाठी जळगांव शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्केट मध्ये दुस—या मजल्यावर असलेल्या सहायक कामगार आयुक्त कार्यालय येथे पाठविले होते. त्यानंतर मी पंच क्र.१ यांचे सह सहायक कामगार आयुक्त कार्यालय येथे गेलो. तेव्हा पाटील साहेब यांनी जळगांव शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्केट मध्ये दुस—या मजल्यावर असलेल्या सहायक कामगार आयुक्त कार्यालयाच्या आजुबाजुस सापळा लावला होता. तेव्हा मी सदर मार्केटच्या आवारातुन माझे मोबाईल फोनवरुन शिपाई गोपाळ चौधरी यांचे मोबाईल फोनवर फोन केला. तेव्हा मी त्यांना मार्केटच्या खाली उभा आहे असे सांगितले. तेव्हा त्यांनी मला मी जेवण करतो आहे. थोडया वेळाने खाली येतो असे सांगितले. त्यानंतर काही वेळाने शिपाई गोपाळ चौधरी हे सदर मार्केटच्या वरच्या मजल्यावरुन मी व पंच क्र.०१ उभे असलेल्या ठिकाणी आले. तेव्हा मी तसेच पंच क्र.०१ व शिपाई गोपाळ चौधरी असे जवळच असलेल्या अनिल एजन्सी नावाच्या दुकानात गेलो. तेव्हा गोपाळ चौधरी यांनी मला माझे कागदपत्रांवर माझे नाव, मोबाईल नंबर, ईमेल आय डी नंबर लिहीण्यास सांगुन, त्यांच्या उजव्या हाताच्या अंगठयाने व पहिल्या बोटाने पैश्याबाबत इशारा करुन किती आणले तुम्ही असे विचारले. तेव्हा मी त्यांना आपले दोन दहा मध्ये ठरले होते. माझे कडे घरात असलेले ३०,०००/—रु. आणले आहेत. तेव्हा शिपाई गोपाळ चौधरी यांनी सदर दुकानात उपस्थित असलेल्या एका इसमाकडे बोट दाखवुन देवुन दे ते पैसे असे सांगितले असता, मी त्यांना तो कोण आहे, मी ओळखत नाही त्या माणसाला असे सांगितले. तेव्हा शिपाई गोपाळ चौधरी यांनी माझे जवळ दे असे सांगितले असता मी माझे पॅन्टच्या पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात असलेली लाच रक्कम ३०,०००/—रु. डाव्या हाताने बाहेर काढून सदर लाच रक्कम शिपाई गोपाळ चौधरी यांचे समोर धरली असता शिपाई गोपाळ चौधरी यांनी सदर ३०,०००/—रु.लाच रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे शर्टच्या पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन घेतली. त्यानंतर मी ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास ईशारा केला. तेव्हा पाटील साहेब व सापळा पथक यांनी शिपाई गोपाळ चौधरी यास रंगेहाथ पकडले. त्यानतर पाटील साहेब यांचे सुचने नुसार माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा पाटील साहेब यांनी शिपााई गोपाळ चौधरी यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर पाटील साहेब यांनी शिपाई गोपाळ चौधरी यांना त्याचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव गोपाळ कडू चौधरी, वय ५५,व्यवसाय नोकरी,शिपाई, सहायक कामगार आयुक्त कार्यालय, जळगांव रा.जुना खेडी रोड, डी.एन.सी.कॉलेज जवळ,जळगांव मुळ रा.पाडळसा ता.यावल जि. जळगांव (खाते उर्जा व कामगार विभाग वर्ग—४) असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने शिपाई गोपाळ चौधरी यांना ताब्यात घेतले.

त्यानंतर पुढील कारवाई ॲन्टी करप्शन ब्युरो, कार्यालयात करण्यात आली. सदर कार्यालयातील एका कक्षामध्ये माझे,आरोपी गोपाळ कडू चौधरी,शिपाई व दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. तसा सलगपणे सविस्तर पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे आरोपी गोपाळ कडू चौधरी,शिपाई, सहायक कामगार आयुक्त कार्यालय, जळगांव जि.जळगांव यांनी दि.११.०४.२०२२ रोजी पंचासमक्ष माझे कडे मला जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामध्ये सिक्युरिटी गार्ड म्हणुन नोकरी मिळवुन देण्याच्या मोबदल्यात प्रथम २,२५,०००/—रु.लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २,१०,०००/—रु. लाचेची मागणी केली. सदर लाचेची रक्कम २,१०,०००/—रु. पैकी पहिला हप्ता म्हणुन ३०,०००/—रु. लाचेची रक्कम माझे कडून आरोपी गोपाळ कडू चौधरी,शिपाई यांनी दि. ११.०४.२०२२ रोजी १४.०० वा. जळगांव शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्केट मधील अनिल एजन्सीज नावाच्या दुकानात स्वत: स्विकारली आहे.म्हणुन माझी आरोपी गोपाळ कडू चौधरी,शिपाई, सहायक कामगार आयुक्त कार्यालय, जळगांव जि.जळगांव यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी सांगितल्या प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती मी वाचुन पाहीली ती मी सांगितल्या प्रमाणे टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

**फिर्यादीची सही**

पंकज वासुदेव पाटील

**समक्ष**

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, जळगांव**